**जिल्हाधिकारी रायगड यांच्या आस्थापनेवरील गट-क संवर्गातील (तलाठी व वाहनचालक) सरळसेवा पदभरती २०१९ च्या अनुषंगाने जाहिरात**

****************************************************************************

**क्रमांक : मशा/आस्था-१/अ-८(१)/अ.ज.सरळसेवा पदभरती/२०१९, दि. २४/०१/२०२०**

जिल्हाधिकारी रायगड यांच्या आस्थापनेवरील गट-क संवर्गातील (तलाठी व वाहनचालक) सरळसेवा पदभरती २०१९ करीता प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने, वाहन चालक पदाकरीता पात्र उमेदवारांची शारीरिक व व्यावसायिक क्षमता चाचणी शनिवार, दि.२५/०१/२०२० रोजी आयोजित करण्यात आली आहे. तसेच तलाठी पदाकरीता पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा बुधवार, दि.२९/०१/२०२० रोजी आयोजित करण्यात आली आहे.

सदर "तलाठी व वाहनचालक पदाच्या परीक्षेसाठी पात्र अथवा अपात्र ठरलेल्या उमेदवारांची सुधारीत अंतिम यादी" तसेच "तलाठी पदासाठी पात्र उमेदवारांचे प्रवेशपत्र" या कार्यालयाचे www.raigad.gov.in/ raigad.gov.in या संकेतस्थळावर दि.२४/०१/२०२० रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

तलाठी पदासाठी पात्र उमेदवारांनी या कार्यालयाचे www.raigad.gov.in/ raigad.gov.in या संकेतस्थळावरुन प्रवेशपत्र डाऊनलोड करुन त्यावर अलिकडच्या काळातील पोसपोर्ट साईजचा रंगीत फोटो चिकटवून तो राजपत्रित अधिकारी यांच्याकडून साक्षांकित करुन घेणे आवश्यक आहे व सदर प्रवेशपत्र परीक्षेच्यावेळी उमेदवाराने आणणे आवश्यक आहे. प्रवेशपत्राशिवाय उमेदवाराला परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही. तसेच सदर ओळखपत्र कोणत्याही उमेदवारास पोष्टाने अगर अन्य मार्गाने पाठविले जाणार नाही

वाहन चालक पदाकरीता पात्र उमेदवारांची शारीरिक व व्यावसायिक क्षमता चाचणी दि.२५/०१/२०२० रोजी सकाळी ०९.०० वाजता जिल्हा क्रिडा संकुल, नेहूली, अलिबाग येथे घेण्यात येणार आहे. वाहन चालक पदाच्या परीक्षेकरीता उमेदवारांना ओळखपत्राची आवश्यकता असणार नाही. तरी सदर दिवशी उमेदवारांनी जाहिरातीत नमूद केलेली आपली मुळ कागदपत्र तसेच ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट पॅनकार्ड यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र तसेच स्मार्टकार्ड प्रकारचे ड्रायव्हींग लायसन्स (Compulsory), उमेदवाराचे छायाचित्र व इतर मजकूर सुस्पष्ट दिसेल अशा मूळ ओळखपत्राच्या छायांकित प्रतींसह जिल्हा क्रिडा संकुल, नेहूली, अलिबाग येथे उपस्थित राहणे आवश्यक आहे.

दिनांक:- २४ /०१/२०२०

ठिकाण :- अलिबाग

**सही /- xxx**
**अध्यक्ष,**
**जिल्हा निवड समिती**
**तथा**
**जिल्हाधिकारी रायगड**